<u>नेवासा येथील राष्ट्रीय लोक न्यायालयामध्ये नि. १ खाली पारीत करण्यात आलेले अॅवॉर्ड</u>
<u>नियमित दिवाणी दावा क्र. ११०३/२०२२</u>

कानिफनाथ विष्णु कराडे वि. सुमन विष्णु कराडे वगैरे

वादी आणि प्रतिवादींच्या संमतीने सदरचा दावा आज दि. **१२ नोव्हेंबर , २०२२** रोजी आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय लोक अदालतमध्ये तडजोडीकरीता घेण्यात आला. **नि. १२** च्या सुलेनाम्यातील नमूद अटी व शर्तींच्या अधिन राहून उभय पक्षकारांमध्ये सुलेनामा/तडजोड झाली आहे. सुलेनाम्याप्रमाणे हक्क प्रस्थापित झालेले असल्यामुळे दोन्ही पक्ष आवश्यक मुद्रांक देवून सुलेनामा नोंदविण्यास तयार आहेत. त्यामुळे वादी व प्रतिवादी यांच्यातील सुलेनामा/तडजोड लक्षात घेवून खालीलप्रमाणे अवॉर्ड पारीत करण्यात येतो -

## <u>अॅवॉर्ड</u>

(१) वादी व प्रतिवादी यांनी दाखल केलेल्या सुलेनाम्याप्रमाणे आणि सध्या प्रचलित असलेल्या वाटपाबाबतच्या कायद्याचे तरतूदींचे अधीन राहून हे अॅवॉर्ड करण्यात येत आहे.

(२) अॅवॉर्डची प्रत दुय्यम निबंधक, नेवासा यांना नोंदणी अधिनियम १९०८ (महाराष्ट्र राज्य दूरूस्ती) चे कलम ८९-अ अन्वये कायद्याचे तरतूदीप्रमाणे नोंदणीकरीता पाठविण्यात यावी.

(३) नि. १२ वरील सुलेनामा पुरसिस ही या अॅवॉर्डचा भाग राहिल.

(४) येणेप्रमाणे दावा निकाली काढण्यात येत आहे.

ठिकाण - नेवासा
दिनांक - १२/११/२०२२

(ए.ए.पाचरणे)
पॅनल प्रमुख पॅनल क्र. ७
राष्ट्रीय लोक अदालत तथा दिवाणी
न्यायाधीश कनिष्ठ स्तर, नेवासा

पॅनल सदस्य क्र. १ ................................